# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १७९-२३** **दिनांक ०३/०६/२०२३**

## वृध्द महिलांची फसवणुक करुन दागिने लंपास करणारी टोळी अटक.
## माणिकपुर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये फिर्यादी नामे श्रीमती जयश्री कृष्णा मगजी, वय ६४ वर्षे हे मधुरम हॉटेल येथुन घरी जात असताना दिनांक २८/०५/२०२३ रोजी २ पुरुष व १ महिला यांनी पैशांचे आमिष दाखवुन बोलण्यामध्ये गुंतवुन त्यांच्या अंगावरील रु.७५,०००/- किंमतीचे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र व कानातील झुमके काढुन देण्यास सांगुन त्याबदल्यात नोटांचा बंडल असल्याचे भासवुन नोटांच्या आकाराचा कागदांचा बंडल व दागिने असल्याचे भासवुन रुमालात बारीक दगड देवुन फसवणुक केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माणिकपुर पोलीस ठाणेत गु.रजि.क्र. १९९/२०२३ कलम ४२०,३४ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपी हे मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई परिसरामध्ये वारंवार अशाप्रकारचे गुन्हे करत असल्याने वरिष्ठांनी गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना गुन्हा उघडकीस आणणेबाबत सुचना व मार्गदर्शन केले होते. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीत नामे १) विजय विनोद सोळंखी ऊर्फ विजय रमेश चव्हाण, वय २० वर्षे, रा. सुलतानपुरी, नॉर्थ वेस्ट, नवी दिल्ली, २) हरीश रामा राठोड ऊर्फ हरीश विष्णु राठोड, वय २८ वर्षे, रा. टगौर गार्डन, दिल्ली पश्चिम, ३) रवि पेलहाद राठोड, वय २८ वर्षे, रा. टँकीवाली झुगी, दिल्ली कॅन्टजवळ, नवी दिल्ली, ४) श्रीमती चौथी बालकिशन परमार ऊर्फ चौथी नारायण सोलंकी, वय ३४ वर्षे, सध्या रा. सुलतानपुरी, नॉर्थ वेस्ट, नवी दिल्ली यांना विरार पुर्व येथे सापळा रचुन शिताफीने अटक केली आहे.

नमूद अटक आरोपीत व त्यांचे सहकाऱ्यांनी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई परिसरामध्ये परिसरात अशाच प्रकारचे अनेक गुन्हे करुन वृध्द महिलांची फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले असून त्यांचेकडुन अंदाजे ५९ ग्रॅम वजनाचे ०२,९५,०००/- रुपये किंमतीचे दागिने जप्त करण्यात आले आहे.

अटक आरोपी याचेकडुन खालील गुन्हे उघड करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | माणिकपुर पोलीस ठाणे, मि.भा.व.वि. | गु.र.क्र. ४०/२०२३, कलम ४२०,३४ भा.दं.वि. |
| २. | माणिकपुर पोलीस ठाणे, मि.भा.व.वि. | गु.र.क्र. १९९/२०२३, कलम ४२०,३४ भा.दं.वि. |
| ३. | नवघर पोलीस ठाणे, मि.भा.व.वि. | गु.र.क्र. ३४६/२०२३, कलम ४२०,३४ भा.दं.वि. |
| ४. | काशिमीरा पोलीस ठाणे, मि.भा.व.वि. | गु.र.क्र. ३९३/२०२३, कलम ४२०,३४ भा.दं.वि. |
| ५. | कस्तुरबा पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र. ३३३/२०२३, कलम ४२०,३४ भा.दं.वि. |
| ६. | निर्मलनगर पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र. २२८/२०२३, कलम ४२०,३४ भा.दं.वि. |

सदर कामगिरी श्रीमती पौणिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०२, वसई, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, माणिकपूर पोलीस ठाणे, स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटिल, धनंजय चौधरी, अनिल चव्हाण व पो.शि. प्रविण कांदे यांनी केली आहे.

----oooo----